MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १५ अंक : ४ पाने : ८ ■ जून-जुलै २०२१ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

'तौक्ते' चक्रीवादळानंतर तसेच सततच्या मुसळधार पावसामुळे ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व राज्यातील इतर जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली. त्यामुळे वीजयंत्रणेचे नुकसान झाले. दरम्यान, खंडित झालेला वीजपुरवठा महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर सुरळीत केला. त्याबद्दल अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनापासून अभिनंदन! विशेष म्हणजे याबद्दल मा. ऊर्जामंत्री महोदयांनीही कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. तसेच मा. मुख्यमंत्री व मा. ऊर्जामंत्री महोदयांनीही पूरस्थितीची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यांच्या सूचना व मार्गदर्शनामुळे आपण पूरस्थितीवर मात करू

- **पूरस्थितीतही अधिकाऱ्यांचे योगदान मोठे**
- **अखंडित वीजपुरवठ्यासाठी सांघिक प्रयत्न**
- **दुर्गम भागातही वीजपुरवठा द्या**
- **मुख्यमंत्री सहाय्यता निधीला मदत**

शकलो. दरम्यान, पूरस्थितीतही आपण जिवाची बाजी लावत वीजपुरवठा सुरळीत ठेवला.

चक्रीवादळानंतरही आपण आपले कामाचे धैर्य कायम ठेवून पूरस्थितीतही वीजपुरवठा अखंडित ठेवला, यातून आपल्या कामाबद्दलची निष्ठा दिसून येते. कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीशी आपण दोन हात करू शकतो, हा आत्मविश्वास आपल्यात आहे, हे यातून स्पष्ट होते. हीच कामाची सकारात्मक ऊर्जा आपल्यात कायम राहो, हीच सदिच्छा व्यक्त करतो.

वाशी परिमंडळांतर्गत २०० के. व्ही. महाड उपकेंद्रात अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे पडलेल्या अति उच्च दाब वाहिनीचे मनोरे महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने पूर्ववत करून वीजपुरवठा सुरळीत केला. दरम्यान, मा. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, रायगडच्या मा. पालकमंत्री श्रीमती आदिती तटकरे व रायगड जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी प्रत्यक्ष कामाची पाहणी करून मार्गदर्शन केले.

अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था विभाग, महाड अंतर्गत २०० के. व्ही. कांदळगाव उपकेंद्र व २०० के. व्ही. महाड उपकेंद्र येथे अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे २२ जुलै २०२१ रोजी अति उच्चदाब वाहिनीचा मनोरा क्र. ९ व १० पडल्यामुळे महाड पोलादपूर तालुक्यातील औद्योगिक, घरगुती वीजपुरवठा खंडित झाला होता. तसेच पुराच्या पाण्यामुळे २२० के. व्ही. महाड उपकेंद्रातील महत्त्वाची उपकरणे निकामी झाली होती.

दरम्यान, वीजपुरवठा तात्काळ सुरू होण्याच्या दृष्टीने महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योग्य ती पाहणी करून योजनाबध्द पध्दतीने मनोरे पूर्ववत केले. उपकेंद्रातील निकामी झालेल्या उपकरणाच्या दुरूस्तीची कामे युध्दपातळीवर केली.

नैसर्गिक आपत्तीमध्ये वीजपुरवठा खंडित झाल्यास सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी व्यवस्थेतून वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सोबत यंत्रणा दुरूस्तीचे काम देखील युध्दपातळीवर केले. सध्या कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीमुळे प्रामुख्याने कोविड रूग्णालये, ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प व रिफीलिंग उदयोग, विलगीकरण कक्ष, लसीकरण केंद्रे, पाणीपुरवठा, मोबाईल टॉवर्स, रेल्वे व अत्यावश्यक सेवांचा वीजपुरवठा अखंडित राहण्यासाठी प्राधान्य दिले.

ग्राहकांना योग्य दाबाचा व अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी येत्या पाच वर्षात राज्यात विविध ठिकाणी उपकेंद्रे, अति उच्चदाब वीजवाहिन्यांचे जाळे व इतर विविध कामे करण्याचे प्रस्तावित आहेत. मेळघाटसारख्या दुर्गम भागातही योग्य दाबाचा वीजपुरवठा करण्यात यावा व या भागातील एकही गाव अथवा पाडा अंधारात राहू नये, यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. यासाठी मा. ऊर्जामंत्री महोदयही विशेष आग्रही आहेत.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या वेतनातील १ कोटी ४२ लाख ४३ हजार ४११ रुपयांचा मदतीचा धनादेश मा. मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांना मा. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आला.

कोविड-१९ संदर्भात राज्य शासनाच्या विविध उपाययोजनांना आर्थिक बळ म्हणून महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला मदत करण्यात आली. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत मुख्यमंत्री सहाय्यता निधीला केलेल्या मदतीबद्दल मा. मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांनी कौतुक करीत समाधान व्यक्त केले.

महापारेषण कंपनीच्या सांघिक सामाजिक



**दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

जबाबदारी फंडातून (CSR) नागपूर जिल्ह्यांतर्गत कोविड-१९ करिता दोन कोटी रूपयांचा मदतनिधी मा. ऊर्जामंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते जिल्हाधिकारी श्रीमती आर. विमला यांना देण्यात आला. तसेच विदर्भ सहाय्यता समितीस लसीकरणासाठी २०० वाहने महापारेषण कंपनीच्या CSR निधीतून प्रदान करण्यात आली. या वाहनांचा लोकार्पण सोहळा नुकताच नागपूर येथे झाला. या सोहळ्यास मा. मुख्यमंत्री व मा. आरोग्यमंत्री यांनी कौतुक करून त्यास शुभेच्छा दिल्या.

श्री अधिकारी ब्रदर्स एंटरप्रायझेस यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांतर्गत आठवा गर्व्हनन्स नाऊ डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन या गटात महापारेषण कंपनीला ई-सेवा पुस्तिका विकसित केल्याबद्दल पुरस्कार देण्यात आला.

महापारेषणच्या ईआरपी आणि आय.टी. विभागाच्या संयुक्त विद्यमाने ई-सेवा पुस्तिका विकसित करून महापारेषणच्या सर्व कर्मचाऱ्यांना ई-सेवा पुस्तिकेची सुविधा एम्प्लॉई पोर्टलव्दारे देण्यात आली आहे. याबद्दल मी संपूर्ण टीमचे मनापासून अभिनंदन करतो. भविष्यातही असेच चांगले काम कराल, असा विश्वास आहे.

**शुभेच्छांसह..!**

**– दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




**मुंबई :** येथील वर्षा निवासस्थानी आयोजिलेल्या बैठकीत बोलताना मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे. शेजारी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, परिवहनमंत्री ॲड. अनिल परब, मुख्य सचिव श्री. सीताराम कुंटे, मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव श्री. आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव श्री. विकास खारगे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री दिनेश वाघमारे, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल.

## ■ मुंबई आयलँडिंगच्या विविध प्रकल्पांचा मुख्यमंत्र्यांकडून आढावा ■

# वीजनिर्मिती तसेच वीजपुरवठ्याचे प्रकल्प गतीने मार्गी लावा : श्री. उध्दव ठाकरे

■ *टीम महापारेषण, मुंबई*

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राची भविष्यातील विजेची मागणी लक्षात घेऊन वीजनिर्मिती तसेच वीजवहन अर्थात पारेषणचे प्रकल्प जलदगतीने मार्गी लावा, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांनी दिले. मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत मुंबई आयलँडिंगच्या विविध प्रकल्पांना त्यांनी तत्त्वत: मान्यता देखील दिली.

या बैठकीस ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, परिवहनमंत्री ॲड. अनिल परब, मुख्य सचिव श्री. सीताराम कुंटे, मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव श्री. आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव श्री. विकास खारगे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री दिनेश वाघमारे, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल, 'बेस्ट'चे महाव्यवस्थापक श्री. लोकेश चंद्रा तसेच टाटा पॉवर, अदानी इलेक्ट्रिसिटी आदी कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

२०२४-२५ पर्यंत मुंबई आणि उपनगरांची विजेची मागणी ५ हजार मेगावॅटपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. सध्या मुंबईतल्या मुंबईमध्ये होणाऱ्या वीजनिर्मितीची (एम्बेडेड जनरेशन) क्षमता १ हजार ८७७ मेगावॅट इतकी आहे. ही क्षमता अजून १ हजार मेगावॅटने वाढवणे आवश्यक असून सध्या मुंबईबाहेरुन पारेषण वाहिन्याव्दारे विजेची मागणी भागवत असताना भविष्यातील मागणी लक्षात घेऊन त्यात अतिरिक्त पारेषण वाहिन्या टाकून वीज पुरवणे आवश्यक आहे, अशी माहिती ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी बैठकीत दिली.

तातडीची गरज म्हणून प्रस्तावित ४०० के.व्ही. विक्रोळी–खारघर सबस्टेशन २०२४ पर्यंत पूर्ण करुन कार्यान्वित करणे, कळवा- पडघे सर्किट १ व २ यांचे एचटीएलएस कंडक्टर बदलून सध्याची १ हजार मेगावॅट वीजवहनाची क्षमता २ हजार इतकी करणे, महानिर्मितीचा उरण येथील वायूआधारित वीजनिर्मिती प्रकल्पाची संपूर्ण कार्यक्षमता वापरात आणून ८०० मेगावॅट वीजनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य करणे, जुने कार्यकाळ संपलेले वीजनिर्मिती प्रकल्पांव्दारे होणाऱ्या वीजनिर्मितीत वाढ करण्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक दुरूस्ती करुन त्यांचे जीवनमान वाढवणे आदी विषयांवर या बैठकीत चर्चा झाली.

मुंबईतील इमारतींच्या छतावर (रुफटॉप) सौरपॅनेलव्दारे सुमारे १ हजार ४०० मेगावॅट वीजनिर्मितीची क्षमता असून या बाबींचाही प्राधान्याने विचार करावा लागेल. बॅटरी एनर्जी स्टोअरेज या नवीन संकल्पनेचाही मुंबईत अवलंब करण्यासंदर्भात चर्चा झाली.

या प्रकल्पांना तातडीने गती देण्यासाठी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स नेमावा, असे आदेश देऊन मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे म्हणाले, या टास्क फोर्सने प्रकल्पांना आवश्यक वनविभागाच्या, वन्यजीव, पर्यावरणविषयक, कांदळवन (मॅंग्रूव्हज) आदीसंबंधीच्या परवानग्या जलदगतीने मिळतील, याकडे लक्ष द्यावे. तसेच मुख्यमंत्री कार्यालयाकडे याबाबत वेळोवेळी माहिती द्यावी, असेही मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले.

यावेळी प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे यांनी सादरीकरण केले.

मी जबाबदार



माझा मास्क. माझी सुरक्षा.

महाराष्ट्र शासन

■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते मुख्यमंत्र्यांना धनादेश सुपुर्द ■

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीला महापारेषणकडून १ कोटी ४२ लाखांची मदत

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या वेतनातील १ कोटी ४२ लाख ४३ हजार ४११ रुपयांचा मदतीचा धनादेश मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांना ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आला.

कोविड-१९ संदर्भात राज्य शासनाच्या विविध उपाययोजनांना आर्थिक बळ म्हणून महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला मदत करण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या निवासस्थानी आयोजित छोटेखानी कार्यक्रमात राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, राज्याचे मुख्य सचिव श्री. सीताराम कुंटे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**मुंबई :** मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी महापारेषणकडून मदतनिधीचा धनादेश मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांना सुपुर्द करताना ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत. शेजारी राज्याचे मुख्य सचिव श्री. सीताराम कुंटे, प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. दिनेश वाघमारे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे.

महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत मुख्यमंत्री सहाय्यता निधीला केलेल्या मदतीबद्दल मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांनी कौतुक करीत समाधान व्यक्त केले. यापूर्वी महावितरण कंपनीच्या वतीने ५ कोटी १७ लाख ३४ हजार ६३१ रुपये व महानिर्मितीच्या वतीने १ कोटी २ लाख ७१ हजार १४३ रुपयांचा मदतनिधी मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांना ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आला होता.

कोरोना विषाणूचे संकट संपविण्यासाठी राज्य शासनाकडून विविध उपाययोजना सुरु आहेत. मात्र, कोरोनामुळे उद्भवलेल्या आरोग्य व आर्थिक आपत्तीवर मात करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देणगी जमा करण्यासंदर्भात आवाहन करण्यात आले आहे. त्यास प्रतिसाद देत महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मे महिन्यातील एका दिवसाचे वेतन १ कोटी ४२ लाख ४३ हजार ४११ रुपयांचा मदतनिधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीला जमा केला आहे.




**नागपूर :** महापारेषणने आयोजिलेल्या ड्रोन कॅमेराचे प्रात्याक्षिक ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, महानिर्मितीचे मुख्य अभियंता श्री. प्रकाश खंडारे, श्री. राजू घुगे, श्री. राजकुमार तासकर व अन्य वरिष्ठ अधिकारी.

■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या उपस्थितीमध्ये झाले प्रात्याक्षिक ■

# विद्युत वाहिन्यांची देखभाल ड्रोन कॅमेरामुळे अधिक प्रभावी

■ *टीम महापारेषण, नागपूर*

``विद्युत वाहिन्यांची देखभाल व निगराणी ड्रोन कॅमेरामुळे अधिक प्रभावीपणे होईल``, असा विश्वास राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने आयोजित केलेल्या अति उच्चदाब वाहिन्यांच्या सर्वेक्षणासाठी वापरत असलेल्या ड्रोन कॅमेराचे प्रात्याक्षिक कोराडी औष्णिक वीज प्रकल्प अंतर्गत विद्युत विहार वसाहत कोराडी येथील पटांगणावर आयोजित करण्यात आले. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या उपस्थितीमध्ये या ड्रोन कॅमेराचे प्रात्याक्षिक झाले. ड्रोन कॅमेराचा वापर अतिउच्च दाब वाहिन्यांच्या देखभालीकरिता बिघाड शोधण्याचे साधन म्हणून कसा वापर करता येते. याचे प्रात्याक्षिक दाखविण्यात आले. यामुळे होणारे फायद्याची तसेच सुलभतेची माहिती देण्यात आली.

यावेळी बोलताना ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत म्हणाले, पारंपारिक पध्दतीपेक्षा नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून अति उच्चदाब वाहिन्यांची निगराणी व देखभाल करण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीने पारेषण कंपनीने उचललेले हे पाऊल निश्चितच अभिनंदनीय आहे. अति उच्चदाब वाहिन्यांची भूमिका फार महत्त्वाची राहत असल्याने या वाहिन्यांची देखभाल व निगराणी आवश्यक आहे. यामुळे विद्युत हानी सुद्धा कमी होण्याची शक्यता असल्याचे डॉ. राऊत यांनी सांगितले. या ड्रोन कॅमेरामुळे होणा-या फायद्याची माहिती महापारेषणच्या नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांनी यावेळी दिली. या नव्या यंत्रणेमुळे अति उच्चदाब वाहिन्यांमधील दोष व बिघाड शोधून काढण्यात मदत होईल, असेही वाळके यांनी सांगितले. या प्रात्याक्षिकाच्यावेळी महानिर्मितीचे मुख्य अभियंता श्री. प्रकाश खंडारे, श्री. राजू घुगे, श्री. राजकुमार तासकर इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

थेट-भेट

■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केली कामांची पाहणी ■

# महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महाडमधील मनोरे केले तातडीने पूर्ववत

■ *टीम महापारेषण, वाशी*

वाशी परिमंडळांतर्गत २०० के. व्ही. महाड उपकेंद्र येथे अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे पडलेल्या अति उच्च दाबाच्या वाहिनीचे मनोरे महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने पूर्ववत केले. दरम्यान ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, पालकमंत्री श्रीमती आदिती तटकरे व रायगड जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी प्रत्यक्ष कामाची पाहणी करून मार्गदर्शन केले. पाहणी दौऱ्यावेळी त्यांच्यासमवेत महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्री. श्रीकांत राजूरकर, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी, महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता श्री. सुरेश गणेशकर, अधीक्षक अभियंता श्री. डी. आर. पाटील यांनी प्रत्यक्ष कामामध्ये सहभाग घेऊन मार्गदर्शन केले.

अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था विभाग, महाड अंतर्गत २०० के. व्ही. कांदळगाव उपकेंद्र व २०० के. व्ही. महाड उपकेंद्र येथे अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे २२ जुलै २०२१ रोजी अति उच्च दाब वाहिनीचा मनोरा क्रमांक ९ व १० पडल्यामुळे महाड पोलादपूर तालुक्यातील औद्योगिक घरगुती वीजपुरवठा खंडित झाला होता. तसेच पुराच्या पाण्यामुळे २२० के. व्ही. महाड उपकेंद्रातील महत्त्वाची उपकरणे निकामी झाली होती.

दरम्यान, वीजपुरवठा तात्काळ सुरू होण्याच्या दृष्टीने महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योग्य ती पाहणी करून योजनाबध्द पध्दतीने मनोरे पूर्ववत केली. उपकेंद्रातील निकामी झालेल्या उपकरणाच्या दुरूस्तीची कामे युध्दपातळीवर केली. वीजपुरवठा सुरळीत केल्याबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

याप्रसंगी अधीक्षक अभियंता (प्रभारी) सर्वश्री मनोज जोशी, अधीक्षक अभियंता (चाचणी व संचरण) मोरेश्वर ढोरे, अधीक्षक अभियंता (प्रकल्प) अनिल भारसाखळे, कार्यकारी अभियंता संजय काटकर, अंकुश जगताप, किशोर गरूड, गिरीश माळोदे, रवींद्र नगरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता युवराज बागडे, धीरज पाटील सचिन कदम, रियाज मुजावर, उपकार्यकारी अभियंता स्वामी दासारी, कपिल गलगलीकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



*महाड : २०० के. व्ही. महाड उपकेंद्र येथे कामांची पाहणी करताना ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, पालकमंत्री श्रीमती आदिती तटकरे, रायगड जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी व अन्य अधिकारी.*

Security Review

■ अधिकाऱ्यांना केल्या सुरक्षेच्या दृष्टीने सूचना ■

# ऊर्जामंत्र्यांनी घेतला महावितरण, महापारेषण मुख्यालय इमारतींच्या सुरक्षेचा आढावा

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण/टीम महानिर्मिती, मुंबई*

राज्यातील वाढत्या आगीच्या घटना पाहता व पावसाळ्यातील खबरदारी म्हणून महावितरण आणि महानिर्मितीचे मुख्यालय असलेल्या वांद्रे येथील प्रकाशगड व महापारेषणचे मुख्यालय प्रकाशगंगा या इमारतींच्या अग्निसुरक्षेबाबत ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी मंत्रालयीन दालनात आढावा बैठक घेतली. या बैठकीला ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे व महावितरणचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत डॉ. नितीन राऊत यांनी या दोन्ही इमारतींचे अग्निसुरक्षा व विद्युत सुरक्षा अंकेक्षण (फायर ऑडिट) झाले असल्यास व त्या ऑडिटमध्ये त्रुटी असल्यास त्याची पूर्तता झाली आहे का? याबाबत विचारणा केली. या ऑडिटमधील त्रुटींची पूर्तता झाली नसल्यास तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी महावितरणला दिले.

महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या ऊर्जा विभागाअंतर्गत असलेल्या तिन्ही कंपन्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने अधिकाऱ्यांची नेमणुका केल्या आहेत का? याबाबत माहिती घेऊन अग्निसुरक्षेबाबत कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी काय व कधी प्रयत्न केले आहेत, याची विचारणाही त्यांनी यावेळी केली.

या इमारतींच्या मोकळ्या जागेत काही अनावश्यक सामान, साहित्य ठेवले तर नाही ना? याची खात्री करा. तसेच अग्निसुरक्षेबाबत कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी, याची भित्तीपत्रके योग्य ठिकाणी लावलेली आहेत का? तसेच नसल्यास तसे लावण्यात यावीत. अग्निशामक दल, पोलीस दल, रुग्णवाहिका इत्यादींचे दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक योग्य त्या ठिकाणी लावण्यात याव्यात, अशा सूचनाही डॉ. राऊत यांनी या बैठकीत महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या.





**मुंबई :** ऊर्जा कंपन्यांमधील अनुकंपा तत्त्वावरील करावयाच्या नेमणुका, नवीन पदांची भरती तसेच पदोन्नती या अनुषंगाने आयोजिलेल्या आढावा बैठकीत बोलताना ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत. शेजारी सर्वश्री उत्तम झाल्टे, भालचंद्र खंडाईत, सुगत गमरे, बी.वाय. मंथा.

### ■ अनुकंपा नियुक्त्यांमध्ये विलंब टाळण्यासाठी धोरण बनविण्याच्या ऊर्जामंत्र्यांच्या सूचना ■

# ऊर्जा कंपन्यांनी भरती प्रक्रियेचा कालबध्द कार्यक्रम तयार करावा : डॉ. नितीन राऊत

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महावितरण, महापारेषण आणि महानिर्मितीसह होल्डिंग कंपनी या चारही कंपन्यांसह महाऊर्जाने भरतीप्रक्रियेचा कालबध्द कार्यक्रम (टाईम बाऊंड कॅलेंडर) जाहीर करावा. उमेदवारांना तिन्हीही कंपन्यांच्या भरती प्रक्रियेत सहभागी होता यावे हा विचार परीक्षेच्या तारखा निश्चित करताना करावा, असे निर्देश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिले.

ऊर्जा कंपन्यांमधील अनुकंपा तत्त्वावरील करायच्या नेमणुका, नवीन पदांची भरती ` तसेच पदोन्नती या अनुषंगाने आढावा बैठक ऊर्जामंत्री डॉ. राऊत यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. यावेळी महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. भालचंद्र खंडाईत, महापारेषणचे कार्यकारी संचालक (प्रभारी) श्री. सुगत गमरे, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक श्री. बी.वाय. मंथा हे मंत्रालयातून तर तिन्हीही ऊर्जा कंपन्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दूरदृश्य प्रणालीव्दारे उपस्थित होते.

ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत म्हणाले, ``न्यायालयीन प्रक्रियेत अडकलेली भरती प्रक्रिया लवकरात-लवकर मार्गी लावण्यासाठी न्यायालयाकडे आपली बाजू सक्षमपणे मांडून पाठपुरावा करावा. भरती प्रक्रिया करताना शासनाच्या निर्देशानुसार योग्य पध्दतीने राबविल्यास न्यायालयात याचिका दाखल होण्याचे प्रमाण कमी होईल.

अनुकंपा तत्त्वावरील भरतीचा आढावा घेताना डॉ. नितीन राऊत म्हणाले की, कंपनीमध्ये कर्तव्य बजावलेला कर्मचारी दुर्दैवाने मयत झाल्यानंतर त्याच्या वारसाला लवकरात लवकर अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती दिल्यास खऱ्या अर्थाने दिलासा मिळेल. अनुकंपा नियुक्त्यांबाबत संवेदनशीलपणे आणि सहानुभूतीपूर्वक विचार केला गेला पाहिजे. या नियुक्त्या वर्षानुवर्षे रखडणे ही बाब त्या कुटुंबावर अन्यायकारक ठरते. यासाठी लवकर नियुक्त्या देण्याच्या दृष्टीने कंपन्यांनी राज्यस्तरावर काही धोरण बनवता येते का, याबाबत चर्चा करुन माहिती सादर करावी, असेही ऊर्जामंत्री यावेळी म्हणाले.

यावेळी महापारेषणचे श्री. सुगत गमरे म्हणाले, ``ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या पुढाकाराने महापारेषण कंपनीच्या मनुष्यबळाची पुनर्रचना (रिस्ट्रक्चरिंग) चांगल्या पध्दतीने करण्यात आल्यामुळे कंपनीतील अधिकारी- कर्मचाऱ्यांनी त्याचे मोठ्या प्रमाणात स्वागत करुन आनंद व्यक्त केला आहे``. यावर इतर दोन्ही कंपन्यांनीदेखील आपल्या मनुष्यबळाचे रिस्ट्रक्चरिंग करुन नवीन भरती तसेच समकक्ष पदांचे एकत्रीकरण करुन कर्मचाऱ्यांना बदलीच्या आणि पदोन्नतीच्या समाधानकारक संधी उपलब्ध होण्यासाठी पुढाकार घेण्याचे निर्देश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी यावेळी दिले. मुंबईतील इमारतींच्या छतावर (रुफटॉप) सौरपॅनेलव्दारे सुमारे १ हजार ४०० मेगावॅट वीजनिर्मितीची क्षमता असून या बाबींचाही प्राधान्याने विचार करावा लागेल. बॅटरी एनर्जी स्टोअरेज या नवीन संकल्पनेचाही मुंबईत अवलंब करण्यास तत्वत: मान्यता या बैठकीत देण्यात आली.

मी जबाबदार
मी जबाबदार
मी जबाबदार
मी जबाबदार
महाराष्ट्र शासन
माझा मास्क. माझी सुरक्षा.

## सर्वांसाठी वीज

■ दुर्गम भागातील एकही गाव अंधारात राहू नये, यासाठी विशेष प्रयत्न करा : ऊर्जामंत्री ■

# राज्यात पारेषणचे जाळे सक्षम करण्यासाठी १० हजार ८२३ कोटींची पंचवार्षिक योजना

■ *टीम महापारेषण, मुंबई*

ग्राहकांना योग्य दाबाचा व अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी येत्या पाच वर्षात राज्यात विविध ठिकाणी उपकेंद्रे, अति उच्चदाब वीजवाहिन्यांचे जाळे व इतर विविध कामे करण्याचे निर्देश राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी महापारेषणला दिले.

मंत्रालय येथे पंचवार्षिक योजनेअंतर्गत महापारेषणने सादर केलेल्या पंचवार्षिक योजनेचा आढावा घेताना मेळघाटसारख्या दुर्गम भागातही योग्य दाबाचा वीजपुरवठा करण्यात यावा व दुर्गम भागातील एकही गाव अथवा पाडा अंधारात राहू नये यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी महावितरण व महापारेषण प्रशासनाला दिले.

सन २०१९-२० ते २०२४-२५ या पाच वर्षात राज्यात एकूण ८७ अति उच्चदाब वीज उपकेंद्रे उभारण्यात येणार असून यामुळे ३० हजार एमव्हीए एवढी क्षमता वाढ होणार आहे. तर १० हजार ७०७ कि.मी. एवढ्या लांबीच्या अति उच्चदाब वाहिन्यांचे नवीन जाळे निर्माण होणार आहे. यासाठी १० हजार ८२३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

महापारेषणचे संचालक (संचलन) (प्रभारी) व महावितरणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी या पंचवार्षिक योजनेचे सादरीकरण केले. प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यावेळी उपस्थित होते.



## एक हात मदतीचा



**नागपूर :** महापारेषण कंपनीच्या सांघिक सामाजिक जबाबदारी (CSR) फंडातून जिल्ह्यांतर्गत कोविड-१९ करिता दोन कोटी रूपयांचा मदतनिधी ऊर्जामंत्री तथा पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते जिल्हाधिकारी श्रीमती आर. विमला यांना देण्यात आला. याप्रसंगी अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूरचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. अविनाश कसबेकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. अभय रोही, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. प्रवीणकुमार दामके, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. विलास रंगारी.



## सन्मान कार्याचा

■ २७ ऑगस्टला सोनमर्गला पुरस्काराचे वितरण ■

# महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांना ग्रीनटेक लिडिंग डायरेक्टर पुरस्कार जाहीर

■ *टीम महापारेषण, मुंबई*

नवी दिल्ली येथील ग्रीनटेक फौंडेशनच्या वतीने दिला जाणारा यंदाचा ग्रीनटेक लिडिंग डायरेक्टर पुरस्कार-२०२१ हा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांना जाहीर झाला आहे. त्यामुळे महापारेषणच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. २७ ऑगस्ट २०२१ रोजी जम्मू आणि काश्मीरमधील सोनमर्गमध्ये होणाऱ्या ग्रीनटेक लिडिंग डायरेक्टर परिषदेत हा पुरस्कार दिला जाणार आहे.

कंपन्यांनी केलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांसाठी व उल्लेखनीय कामगिरीसाठी हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. सांघिक व्यवस्थापन आणि कंपनीच्या शाश्वत व निरंतर प्रगतीसाठी काम करणाऱ्या नेतृत्वाचा या पुरस्काराने गौरव केला जातो. या पुरस्कारामुळे कंपनीचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. श्री. दिनेश वाघमारे (आय.ए.एस.) हे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून दि. २३ जानेवारी २०२० रोजी रुजू झाले आहेत. सध्या ते ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव म्हणून कार्यरत आहेत. ते १९९४ च्या बॅचचे वरिष्ठ सनदी अधिकारी आहेत.



श्री. वाघमारे यांना व्यवस्थापन व प्रशासन क्षेत्रातील २७ वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. त्यांनी बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स) विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेतून (व्हीएनआयटी) केले आहे. ते आय.आय.टी. खरगपूरचे एम.टेक. (कॉम्प्युटर सायन्स) इंजिनिअर आहेत. इंग्लंडच्या ब्रॅडफोर्ड विद्यापीठातून त्यांनी विकास आणि प्रकल्प नियोजन या विषयातून एम.एस्सी. केले आहे. त्यांना संघबांधणी, प्रकल्प नेतृत्व, प्रशासन आणि व्यवस्थापन यांचा मोठा अनुभव आहे.

---

## डिजिटल सेवा

■ ईआरपी आणि आय.टी. विभागाची कामगिरी ■

# महापारेषणच्या ई-सेवा पुस्तिका प्रणालीला डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन पुरस्कार प्रदान




■ *टीम महापारेषण, मुंबई*

श्री अधिकारी ब्रदर्स एंटरप्रायझेस यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांतर्गत आठवा गर्व्हनन्स नाऊ डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन या गटात महापारेषण कंपनीला ई-सेवा पुस्तिका विकसित केल्याबद्दल पुरस्कार देण्यात आला.

सार्वजनिक क्षेत्रात उत्कृष्ट आणि भरीव कामगिरी करणाऱ्या संस्थांना हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या वतीने महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर यांनी दूरदृश्य प्रणालीव्दारे हा पुरस्कार स्वीकारला.

महापारेषणच्या ईआरपी आणि आय.टी. विभागाच्या संयुक्त विद्यमाने ई-सेवा पुस्तिका विकसित करून महापारेषणच्या सर्व कर्मचाऱ्यांना ई-सेवा पुस्तिकेची सुविधा एम्प्लॉई पोर्टलव्दारे देण्यात आली आहे.

ई-सेवा पुस्तिका विकसित केलेल्या प्रणालीबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी समाधान व्यक्त करून टीममधील सर्व सदस्यांचे कौतुक केले.

ई-सेवा पुस्तिका प्रणाली विकसित करण्यासाठी संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा. सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (आस्थापना) श्री. राजू गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपमहाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) (प्रभारी) श्री. शैलेंद्र दुर्गे, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) श्री. अनिल कुमार, प्रणाली विश्लेषक श्री. विजय विटेकर, अतिरिक्त कार्यकारी अभियता श्री. मनोज जैयस्वाल, व्यवस्थापक (मा. सं.) श्री. संतोष कडलग, प्रोग्रॅमर कु. भावना कोळी यांनी ही ई-सेवापुस्तिका विकसित केली आहे.

From the Desk of ED, HR

# कौशल्य विकास आणि आपण




सध्याच्या स्पर्धात्मक जगात स्वत:ला सर्वार्थाने सक्षम करण्याचे महत्व किती वाढले आहे, हे वेगळे सांगण्याची गरज राहिलेली नाही. त्यात भर म्हणजे तंत्रज्ञानाचा वापर प्रचंड वाढला आहे. आपल्या व्यक्तीमत्वाला आकार देण्यासाठी या दोन्ही वस्तुस्थितीचा सकारात्मकतेने स्वीकार करणे आवश्यक आहे. आपल्या आजूबाजूला अनेक बदल सातत्याने होत आहेत. त्यांचा वेग पूर्वीपेक्षा वाढला आहे. एवढेच नव्हे तर त्यातील काही बदल आपण आत्मसात केले नाहीतर आपण आपली सेवा पूर्ण क्षमतेने बजावण्यात कमी पडू शकतो. ज्यामुळे वैयक्तिक जीवनात तर आपले नुकसान होतेच, पण आपण ज्या कंपनीसाठी काम करत असतो, त्या कामालाही आपण पूर्ण न्याय देऊ शकत नाही. आपल्यातील कौशल्य विकासाला फार महत्व असून त्याचा आपण विचार केला पाहिजे.

**१. नवे शिकण्याची तयारी –** आपल्यासमोर दररोज नवे विषय येत असतात. त्यात कालानुरूप काही बदल करावयाचे असतात. पण नवे शिकून घेण्याची तयारी नसेल तर आपण ती गोष्ट जुन्याच पध्दतीने करत राहतो. ज्यात विनाकारण वेळ तर जातोच, पण ती गोष्ट आपल्याला येत नाही, याची सल मनात रहाते. कारण ती गोष्ट करण्यासाठी आपल्याला नेहमी दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते.

**२. संवाद कौशल्य –** आपल्या व्यक्तीमत्वामध्ये संवादाला खूप महत्व आहे. आपल्याशी इतरांचा होणारा संवाद आपण तपासला तर असे लक्षात येते की, त्यात अनेक सुधारणा करण्याची गरज आहे, हे सहजच कळून येते. अलीकडे या संबंधी शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाते. त्याचा लाभ आपण घेतला पाहिजे.

**३. कार्पोरेट वृत्ती –** आपण जेव्हा एका कंपनीसाठी काम करत असतो, तेव्हा तेथे एक वर्क कल्चर तयार झालेले असते, जे काम सुरळीत चालण्यासाठी आवश्यक असते. कार्यालयात असताना हळू बोलणे, वैयक्तिक विषयांवर चर्चा न करणे, वेळ घेऊन सहकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना भेटणे, संपर्कात राहून वेळच्या वेळी प्रतिसाद देणे, वेळेचे काटेकोर नियोजन करणे अशा काही गोष्टी या कल्चरमध्ये असू शकतात.

**४. तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे –** तंत्रज्ञानाचे महत्व सर्वच क्षेत्रात वाढले आहे. कंपन्यांमध्ये तर त्याला अतिशय महत्व आहे. कारण, त्यामुळे कामाचा वेग वाढतो आणि कंपनी स्पर्धेमध्ये पुढे रहाते.

**५. आपल्या विषयात अपडेट रहाणे** –आधुनिक जगात सर्वच गोष्टी फार वेगाने बदलत आहेत. त्यामुळे आपली रोजगाराची गरज संपली की, आपल्याला त्या बदलांची दखल घेण्याची गरज नाही, या गैरसमजापासून दूर राहिले पाहिजे. आपण ज्या क्षेत्रात काम करत आहोत, त्या क्षेत्राची संबंधित नियतकालिके वाचली पाहिजेत. पुस्तकांचेही वाचन केले पाहिजे.

**६. संवादासाठीची भाषा –** मराठी ही आपली मातृभाषा आहे आणि बहुतांश ठिकाणी आपण ती वापरत आहोत. मात्र संगणकामुळे आणि राष्ट्रीय पातळीवरील व्यवहारांमुळे इंग्रजीचे कार्यालयीन कामांतील महत्व नाकारता येणार नाही. त्यामुळे त्या भाषेचा वापर बिनचूक करण्यासाठी इंग्रजी भाषा कौशल्य असणेही महत्वाचे आहे. शिवाय, आपल्या वैयक्तिक जीवनातही अधिकाधिक भाषा आत्मसात करणे, हे आपल्या हिताचे आहे.

आपला देश जगात सर्वात अधिक तरुण असलेला देश आहे. पण कौशल्याचा विचार करता आपण जगाच्या मागे आहोत. कुशल मनुष्यबळ ही आपल्या देशाची गरज आहे.

देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासात ऊर्जेचे महत्व कोणीच नाकारू शकत नाही. उत्पादनात ऊर्जेचा मोठा वाटा आहे. त्यामुळे या क्षेत्रात काम करणारे मनुष्यबळही तेवढेच सक्षम असले पाहिजे.

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**
**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.